INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

February-2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue 287

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

February-2022
E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-287

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo : Rasia's attack on Ukrain (Source-Internet)

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare** - Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse**- MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** - M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.



**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

| | | |
|---|---|---|
| 26 | हिंदी के प्रचार-प्रसार में इलेक्ट्रॉनिक माध्यमों की भूमिका (रेडिओ तथा दूरदर्शन के संदर्भमें) **डॉ.रमेशकुमार गबळी** | 130 |
| 27 | सोशल मीडिया : बदलता भारतीय परिवेश **डॉ. संगिता चित्रकोटी** | 135 |
| 28 | विद्यार्थीयों के जीवन में मराठी भाषा विषयक रुचि निर्माण करने में ग्रंथालयों की भूमिका **डॉ. वंदना जामकर** | 141 |
| | **मराठी विभाग** | |
| 29 | भारतीय आदिवासींच्या दैवत कथा **डॉ. अंजली मस्करेन्हस** | 145 |
| 30 | संत ज्ञानेश्वरांचा मानवताद **डॉ. मीनाक्षी पाटील** | 151 |
| 31 | संत एकनाथांच्या भारूडातील फिरस्ते, भटके, उपेक्षित व बहुजनांचे चित्रण **डॉ. मधुकर बैकरे** | 155 |
| 32 | प्राचीन चीन संस्कृतीमधील समाज जीवन **प्रा. एस. एस. मारकवाड** | 161 |
| 33 | तडवी बोलीचे सामाजिकीकरण **रमजान तडवी, डॉ. उज्वला भोर** | 165 |
| 34 | जोतीराव फुले : स्त्रीमुक्तीचे प्रेरक आंदोलन **डॉ. अनमोल शेंडे** | 169 |
| 35 | 'हिंदू: जगण्याची समृध्द अडगळ' कादंबरीतील स्त्री विषयक चित्रण **प्रा.गौतम भालेराव** | 174 |
| 36 | मराठी विज्ञानकथेतील स्त्री- पात्रचित्रण **डॉ. विलास धनवे** | 178 |
| 37 | आंबेडकरवाद:समकालीन संदर्भ **डॉ. सुरेश वर्धे** | 181 |
| 38 | नामदेव ढसाळांच्या कवितेतील आशय आणि विद्रोह **डॉ. धनराज माने** | 185 |
| 39 | साहित्यिक डॉ. लीला गोविलकर यांच्या कविता लेखनातील प्रतिमा व प्रेरणा **शिवाजी शिंदे** | 189 |
| 40 | अस्तित्व शोधाचा प्रवास - 'सरोवर' **प्रा. विद्या सुर्वे-बोरसे** | 197 |
| 41 | 'समाज समता संघ आणि कौटुंबिक सहभोजने' - समाज परिवर्तनाचा उपक्रम **डॉ. किशोर काजळे** | 199 |
| 42 | पुणे शहरातील निवडक ऐतिहासिक स्थळांची ऐतिहासिक चिकित्सा **डॉ. नामदेव रासकर** | 206 |
| 43 | स्वातंत्र्यपूर्व काळातील मालेगाव येथील कापड उद्योग निर्मितीचा ऐतिहासिक आढावा **डॉ. संजय शेलार, सुभाष आहिरे** | 211 |
| 44 | महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनात दबाव गटांची भूमिका : विशेष संदर्भ 'नाशिक ते मुंबई किसान लाँग मार्च' **रविराज वटणे** | 216 |
| 45 | राजकीय नेतृत्व – महिलांचा सहभाग **डॉ. सुनिल चकवे** | 221 |
| 46 | महाराष्ट्रातील पर्यावरणवादी चळवळ : बळीराजा धरण **डॉ. राहुल गोंगे** | 224 |
| 47 | भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल आणि सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने बदलाबाबतच्या अपेक्षा **डॉ. नीता वाणी** | 230 |
| 48 | भारतीय अर्थव्यवस्थेपुढील समस्या - दारिद्र्य **प्रा. दशरथ पानमंद** | 236 |
| 49 | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना **प्रा. कृष्णा पाडवी** | 239 |
| 50 | १९६५ च्या भारत-पाकीस्तान युध्दात मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण नागरिक समितीचे आर्थिक योगदान **डॉ. संजय शेलार, सुभाष आहिरे** | 244 |
| 51 | धुळे शहरातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास **डॉ. मीनाक्षी महाले** | 249 |
| 52 | अध्ययन-अध्यापन आणि माध्यमाची भाषा **डॉ. राजेश्वर दुडूकनाळे** | 254 |
| 53 | सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मोबाईलद्वारे इंटरनेट वापराचे मूल्यमापन **डॉ. ए. बी. मुळीक, डॉ. एन. ए. पाटील** | 261 |
| 54 | नाशिक जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेमध्ये खेळलेल्या कयाकिंग खेळाडूंच्या मानसिक ताणाचा तुलनात्मक अभ्यास **प्रा. सुहास वराडे** | 268 |

E-ISSN : 2348-7143
February-2022

# १९६५ च्या भारत-पाकीस्तान युध्दात मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण नागरिक समितीचे आर्थिक योगदान

**डॉ. संजय टी. शेलार**
संशोधन मार्गदर्शक (इतिहास)
संशोधन केंद्र, अहमदनगर जिल्हा
मराठा विद्याप्रसारक न्यू कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर
Sanjayshelar99@gmail.com
M. 9421979479

**सुभाष एल. आहिरे**
संशोधक विद्यार्थी, सहयोगी प्राध्यापक
महात्मागांधी विद्यामंदिर संचलित
कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय, निमगाव
ता. मालेगाव जि. नाशिक
slahire68@gmail.com M. 8149534737

**गोषवारा –**

*भारताच्या फाळणीनंतर भारत व पाकीस्तान यांच्यात सतत काश्मीर प्रश्नावरून संघर्ष सुरू झाला तेव्हा भारतीय लष्कराला आर्थिक पाठबळ देण्यासाठी मालेगाव येथे मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण समिती तर्फे मालेगाव शहर व मालेगाव तालुका ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात निधी जमा करण्यात आला. याप्रसगांत मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण नागरिक समितीचे कार्य थोडक्यात शोधण्यात येत आहे.*

**शब्दसूचक –** युध्द, सरंक्षण समिती, मालेगाव शहर, मालेगाव ग्रामीण निधी, आर्थिक पाठबळ, इ. बचत रोखे, मदत, एकूण निधी.

**उद्देश -** 1) भारत-पाकीस्तान युध्द (1965) कालखंडात मालेगावातील राष्ट्रीय संरक्षण नागरिक समितीचे कार्य शोधणे.

2) राष्ट्रीय संरक्षण निधीमध्ये व्यक्ती, संस्था, नगरपालिका, ग्रामपालिका, सहकारी बँका यांचे आर्थिक योगदान शोधणे.

3) राष्ट्रीय संरक्षण नागरिक समितीने जमा केलेला एकूण निधी जिल्हाधीकारी कार्यालयाकडे जमा केल्याची माहिती मिळविणे.

4) हिंदू-मुस्लीम ऐक्य आर्थिक परीपेक्षातुन पाहणे.

**गृहतिके -** 1) भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये सन 1965 मध्ये युध्द झाले होते.

2) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातून राष्ट्रीय संरक्षण समितीने भारतीय सैन्यासाठी आर्थिक निधी जमा केला होता.

3) मालेगाव शहर व ग्रामीण भागातून निधी जमा झाला होता.

4) राष्ट्रीय संरक्षण निधी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सुपूर्द केला होता.

**मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण नागरिक समिती कार्य :-**

13 सप्टेंबर 1965 रोजी मालेगाव नगरपालिकेच्या सभागृहात डॉ. नवलरॉय शहा यांच्या अध्यक्षतेखाली मालेगाव शहरातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची बैठक घेऊन मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण

E-ISSN : 2348-7143
February-2022

नागरिक समितीच्या कार्यकारी मंडळाची निवड केली. या कार्यकारी मंडळात अध्यक्ष – डॉ. नवलरॉय शहा, सेक्रेटरी – या. ना. जाधव आणि कार्यकारिणीत – व्यंकटराव हिरे, हारून अन्सारी, बाळासाहेव राजेवहाद्दर, मोतीलाल विचंद शहा, खालिल बुद्दन सरदार, यांची निवड करण्यात आली. या बैठकीत संरक्षण समिती मार्फत धोरण आखण्यात आले की, 'मालेगाव शहराची लोकसंख्या सुमारे एक लाख पन्नास हजाराचे आसपास आहे. तेव्हा माणसी एक रूपया प्रामणे 1 लाख 50 हजार रू. संरक्षणनिधी जमा करण्यात यावा' असे अवाहन केले.[1] तसेच ग्रामीण भागातून संरक्षण निधी जमा करण्याकरिता मालेगाव तालुका तहसिल कार्यालयाच्या आवारात 27 सप्टेंबर सुमारे 40 हजार लोक सहभागी झाले होते. मिरवणूकीचे सभेत रूपांतर होऊनं "आय्युव भुत्तो मूर्दाबाद 'हिंदुस्थान जिंदाबाज' काश्मीर हमारा है!" अशा घोषणा देण्यात आल्या.[2]

**मालेगाव शहरातून जमविलेला संरक्षण निधी :-**

मालेगाव शहर राष्ट्रीय संरक्षण नागरिक समिती मार्फत 2 ऑक्टोबर 1965 पासून संरक्षण निधी जमा करण्याकरिता मालेगाव मर्चट को-ऑपरेटीव्ह बँकेटीव्ह बँकेच्या तिसऱ्या वार्षिक सभेच्या वेळी बँक सभासदांना विनंती करून 6109.50 रू. निधी मिळविला होता. तसेच 2001 रू. भागचंद मोतीलाल लोढा, 2401 रू. राजस्थान मंडळ, मालेगाव 901 रू. भिमा गवळी, 1001 रू. हॉटेल असोसिएशन, 21000 रू. शेतकी संघ यांनी मदत केली. तसेच 28 व्यक्तींनी 101 रु. प्रमाणे 4228 रूपये मदत केली. 4 व्यक्तींनी 150 रू. प्रमाणे 900 रू., 6 व्यक्तींनी 131 रू. प्रमाणे 786 रू., 13 डॉक्टरांनी 125 रू. प्रमाणे 1625 रू. मदत केली. मालेगाव शहरातील विविध समाजातील 60 व्यक्तींनी 101 रू. प्रमाणे 6161 रू. मदत केली तसेच विविध व्यावसायिक 9 व्यक्तिंनी 75 रू. प्रमाणे 675 रू. तसेच मालेगाव शहरातील सर्व शाळातील 71 रू. प्रमाणे 904 रूपये, पशुरोग दवाखान्यातील सेवकांनी 62 रू. प्रमाणे 244 रू. मदत केली तसेच मालेगाव शहरातील 88 व्यक्तींनी 51 रूपये प्रमाणे 4488 रू. मदत केली. तसेच मालेगाव शहरातील लहान व्यवसाय करणाऱ्या 18 व्यक्तींनी 31 रू. प्रमाणे 558 रू. मदत केली. तसेच सर्वसामान्य असलेल्या 56 व्यक्तींनी 25 रू. प्रमाणे 1440 रू. मदत केली. तर 28 व्यक्तिंनी 21 रू. प्रमाणे 588 रू., 15 व्यक्तींनी 20 रू. प्रमाणे 300 रू., मदत केली. अशा प्रकारे मालेगाव शहरातून एकूण 56076 रू. रोख रक्कम मदत मिळविली.[3]

**ग्रामीण भागातून जमा केलेला संरक्षण निधी :-**

शहरी विभागाप्रमाणे ग्रामीण विभागातूनही संरक्षण निधी जमा करण्यात यावा, यासाठी या.ना. जाधव यांनी मालेगाव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या संरपंचाची 27 सप्टेंबर 1965 रोजी तहसिलदार कार्यालयाच्या आवारात बैठक घेऊन ग्रामीण विभागातून संरक्षण निधी जमविण्याचे आवाहन केले. परंतु ग्रामीण विभागातून पाहिजे तेवढ्या प्रमाणावर संरक्षण निधीस सहकार्य मिळत नव्हते, म्हणून मालेगाव तालुक्याचे तत्कालीन तहसिलदार श्री. राणे यांना बरोबर घेऊन या. ना. जाधव यांनी ऐन दिवाळी सणाच्या काळात ग्रामीण विभागात फिरून संरक्षण निधीस मदत करण्याचे आवाहन करून काही गावातून संरक्षण निधी जमा केला तो खालीलप्रमाणे :

निमगावातून 1002 रू., उमराणे गावातून 1111 रू., पाटणे गावातून 296 रु., कळवाडी गावातून 35 रू., सौधाणे गावातून 551 रू., ग्रामीण विभागातील सहकारी सोसायट्यातून 20,000 रू., संरक्षण निधी जमा केला. अशा रितीने 23030 रू. ग्रामिण भागातून मदत जमा केली.[4]

E-ISSN : 2348-7143
February-2022

**राष्ट्रीय संरक्षण बचत रोखे यातून जमविलेला संरक्षण निधी :-**

राष्ट्राची सर्व वळकटी आर्थिक बळावर आहे. त्यसाठी त्यागातून स्वार्थ साधण्याची योजना राष्ट्राने उपलब्ध करून दिली आहे. जो पैसा शिल्लक म्हणून ठेवतो, ऐनवेळेची तरतूद, व्यापार, शिक्षण, वार्धक्य किंवा तत्सम योजनांसाठी शिल्लक ठेवतो तो पैसा राष्ट्रीय अल्पबचत योजनेत गुंतवावा त्या योगे आपली बचत सुरक्षित राहून तिचा आपणास योग्यवेळी उपयोग होईल. यासाठी राष्ट्रीय संरक्षण बचत रोखे खरेदी करा. त्यातून मिळालेला हा पैसा राष्ट्राचे संरक्षण, विकास व उत्कर्षासाठी उपयोगी पडेल. त्यायोगे आपणांस राष्ट्र सेवेचे श्रेय मिळेल.[5] असे आवाहन या.ना. जाधव यांनी केले. त्यास प्रतिसाद देवून खालील व्यक्तींनी बचत रोखे खरेदी केले.

| | | | |
|---|---|---|---|
| माळी पंडीत डोंगर | 30,000 | नंदीछाप मुर्तूजाशेठ | 3,000 |
| पवार भगतराव देवराम | 10,000 | चतुर्भूज सुवालाल | 3,000 |
| लिंगायत ओकांर गोविंद | 5,000 | इसाक हफिनजी | 3,000 |
| डॉ. शहा नवल रॉय | 5,000 | शहा कांतीलाल विरचंद | 3,000 |
| गुजराती मोतीलाल | 5,000 | मुकादम सादीक | 3,000 |
| लोढा भागचंद शेठ | 5,000 | गुजराथी भागचंद | 2500 |
| गांधी नादीर शेठ | 5,000 | आनंदराज आणि कंपनी | 2000 |
| अस्मर हिरालाल भिला | 5,000 | शाबीर हसन | 2000 |
| शाह ठाकरदास व्ही. | 5,000 | चमडेवाले युसूफ शेठ | 2000 |
| इसाक हबिबुल्ला ॲण्ड कं. | 5,000 | हाजी जहीर शेठ | 2000 |
| शेठ युसूफ | 5,000 | भावसार रणछोडदास | 2000 |
| मालू फचेलाल | 5,000 | जाखोडीया गुलाबचंद | 2000 |
| पहिलवान कादीर | 5,000 | कुवरलाल रूपचंद | 2000 |
| मियाजी सादीक | 5,000 | हिराचंद नागचंद | 2000 |
| रसाक अब्दुल्ला | 5,000 | अझिझभाई ब्लूबर्ड | 2000 |
| युनायटेड सायझिंग | 5,000 | बद्रुजमा मोहमंद मास्तर | 2000 |
| सरदार खली उद्दीन | 3,000 | शकुर शेठ | 2000 |
| नागछाप मुस्तफा शेठ | 3,000 | पिरमोहमद शेठ | 2000 |
| मुकादम हनीफ | 3,000 | रहेमान शेठ | 2000 |
| काबरा घनश्यामदास | 3,000 | लाड चंदुलाल | 2000 |
| काबरा ॲण्ड कंपनी | 3,000 | वर्धमान टी कंपनी | 2000 |
| लालूभाई हिम्मतलाल | 3,000 | बछराज कल्याणमल | 1000 |
| वडवे भास्कर शंकर | 3,000 | डॉ. खालीक | 1000 |
| काजीभाई कसनलाल | 3,000 | काकणी रमणलाल | 1000 |
| माळी कंपनी | 3,000 | हाजी याकूब मिरा | 1000 |

| | | | |
|---|---|---|---|
| यासीन शेठ | 3,000 | एबादुल्ला तुरूहुदा | 1000 |
| मुस्तफा मोहमंद रेशमावले | 3,000 | जवाहिर वशील | 1000 |
| नामपुरी उमरशेठ | 1000 | ताजछाप आयुवशेठ | 1000 [6] |

वरील व्यक्तींनी राष्ट्रीय संरक्षण बचत रोख्यातून एकूण 2,85,500 रूपये संरक्षण निधीस मदत केली.

**करमणूक कार्यक्रमातून जमविलेला संरक्षण निधी :-**

राष्ट्रीय संरक्षण निधीस मदत मिळविण्याकरिता मालेगाव तालुका संरक्षण समितीचे सेक्रेटरी या.ना. जाधव यांनी विजयादशमी सणाचे दिवशी मालेगाव शहरात राष्ट्र सेवादल कलापथकाचा करमणुक कार्यक्रम आयोजित करून त्यातून मिळालेले 651 रूपये संरक्षण निधीस जमा केले. तसेच महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या आवारात 18 नोव्हेंबर 1965 रोजी स्थानिक म्युझिक सर्कलचा कार्यक्रम आयोजित करून त्यातून मिळालेले 930 रू. सरंक्षण निधीत जमा केले.[7]

अशा प्रकारे करमणुकीच्या कार्यक्रमातून एकूण 1481 रू. जमा केले.

**भेट/वस्तु स्वरूपातून जमा केलेला संरक्षण निधी :-**

मातृभूमीचेब संरक्षण करणाऱ्या आघाडीवर लढणाऱ्या सणासुदाच्या काळातही घरापासून लांब राहणाऱ्या सैनिकांसाठी मालेगाव तालुका राष्ट्रीय नागरिक संरक्षण निधी समितीने शहरातील प्रसिध्द डॉ. वसंत मेहता यांच्या मुलांनी घरोघरी जाऊन 1000 सांजोऱ्या व मिठाई जमा करून ती योग्य अधिकाऱ्यांमार्फत आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांना दिवाळीची भेट म्हणून पाठविण्यात आली. तसचे मालेगावातील राजस्थान मंडळातर्फे 150 थरमास फ्लॉक्स् पाठविण्यात आले.[8]

अशा रीतीने मालेगाव तालुका राष्ट्रीय संरक्षण नागरिक समितीचे सेक्रेटरी या. ना. जाधव यांनी राष्ट्रीय संरक्षण निधीस मदत मिळविण्या शहर, ग्रामीण विभागातून समाजातील सर्व प्रकारच्या लोकांकडून मिळेल त्या स्वरूपात संरक्षण निधी व सैनिक यांना मिळेल त्या स्वरूपाची मदत 3 जानेवरी 1966 पर्यंत मालेगाव शहर व ग्रामीण विभागातून 4,23,715 रू. संरक्षण निधी जमा करून नाशिक जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे व काही ठेवी स्वरूपात बँकेत जमा केले.[9]

**उपसंहार –**

भारत-पाकीस्तान 1965 च्या युध्दात मालेगाव येथील हिंदू-मुस्लीम धर्मातील बांधवानी आर्थिक मदत देण्याकरीता मोलाचा हातभार लावला आहे. मालेगाव येथे 'तालुका राष्ट्रीय संरक्षण नागरीक समिती' स्थापन केल्यानंतर या समितीला मोठ्या प्रमाणात चांगला आर्थिक हातभार लावण्यात आला. भारतीय हिंदू-मुस्लीम ऐक्य याठीकाणी पाहण्यास मिळाले. भारताच्या इतिहासात हे एक महान कार्य आहे.

**संदर्भ -**

1. साप्ताहिक धडपड, मालेगाव आवृत्ती, दि. 1 ऑक्टोबर 1965.
2. कित्ता.
3. साप्ताहिक धडपड, मालेगाव आवृत्ती, दि. 19 डिसेंबर 1965.
4. साप्ताहिक धडपड, मालेगाव आवृत्ती, दि. 3 डिसेंबर 1965.

E-ISSN : 2348-7143
February-2022

**5.** साप्ताहिक धडपड, पूर्वोक्त, दि. 1 ऑक्टोबर 1965.
**6.** पूर्वोक्त, दि. 3 डिसेबर 1965.
**7.** पूर्वोक्त, 19 नाव्हेबर 1965.
**8.** पूर्वोक्त, 05 नोव्हेबर 1965.
**9.** पूर्वोक्त, दि. 07 जानेवारी 1966.

RESEARCH JOURNEY